# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०२/०४/२०२५ (बुधवार)**

## नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात आली अवैध अग्निशस्त्राबाबत विशेष मोहीम , ४ गुन्हे नोंद , ४ अवैध देशी बनावटीचे अग्निेशस्त्रे , १० जिवंत काडतुस जप्त,४ आरोपी अटक
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांची अवैध धंदयावर करडी नजर असुन नेहमीच अवैध धंदयावर कारवाई करणे कामी त्यांच्या मार्गदर्शनाखाली पथके तयार करून कारवाई करण्यात येते. दिनांक ०१/०४/२०२५ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांना अवैध अग्निशस्त्राबाबत विशेष मोहीम राबविण्याबाबत आदेशित केले. सदर आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांच्या पथकाने अवैध अग्निशस्त्राबाबत गुप्तबातमीदारा मार्फतीने माहीती काढुन खालील प्रमाणे कारवाई करून ४ गुन्हे नोंद केले.

**कारवाई क्र . १** स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अग्निशस्त्रांबाबत कारवाई करणे कामी पेट्रोलींग करीत असतांना गुप्तबातमीदारा मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, केळवद पोलीस स्टेशन हद्दीत मौजा सालई शिवारातील सालई फाटा येथे आरोपी नामे विश्वास राहुल सोलंकी, रा. तिडंगी ,पारधी बेडा, ता. कळमेश्वर हा त्याचे ताब्यात देशी बनावटीचे माऊजर व जिवंत काडतुस घेवुन हस्तक्षेपनिय गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरत आहे. अशी माहीती मिळताच पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी जावुन आरोपीला गाठुन त्याचे नाव गाव पत्ता विचारले असता **विश्वास राहुल सोलंकी, वय २७ वर्षे, रा. तिडंगी ,पारधी बेडा ता कळमेश्वर** अशी माहीती प्राप्त झाली. आरोपीची पंचासमक्ष झडती घेतली असता त्याचे जवळ एक देशी बनावटी चे अग्निशस्त्र माऊजर , ४ जिवंत काडतुस असे मिळुन आले. आरोपीला अग्निशस्त्र

परवान्याबाबत विचारले असता त्याच्या कडे परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. आरोपीला सदर अग्निशस्त्र कोठुन आणले याबाबत विचारणा केली असता त्याने सदर अग्निशस्त्र **सौरभ उर्फ शाहरूख रमेश राजपुत, वय २९ वर्षे ,रा ओझा ढाणा, पोलीस स्टेशन कोतवाली जि बैतुल राज्य मध्यप्रदेश याने त्याचे ग्राहक राहुल राजेंद्र तागडे, वय ३० वर्षे, रा. पिपळा,डाग बंगला वार्ड क्र २ आणि राष्ट्रपाल मधुकर मेश्राम रा पिपळा डाग बंगला यांना देण्यासाठी आणल्याचे सांगितले.** पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातुन एक लोखंडी देशी बनावटीचे अग्निशस्त्र माऊजर किंमती ५०,००० /— रूपये, ४ जिवंत काडतुस ४०००/— रूपये, अॅड्रॉईड मोबाईल किंमती २०,०००/— रूपये, केटीम स्पोर्ट मोटरसायकल क्रमांक एम एच ४० बी.एस १६४० किंमती १,५०,०००/— रूपये असा एकुण **२,२४,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**कारवाई क्र . २** स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अग्निशस्त्रांबाबत कारवाई करणे कामी पेट्रोलींग करीत असतांना गुप्तबातमीदारा मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, केळवद पोलीस स्टेशन हद्दीत उमरी बसस्टॉप येथे आरोपी नामे पंडीत शुक्ला हा त्याचे ताब्यात देशी बनावटीचे माऊजर व जिवंत काडतुस घेवुन हस्तक्षेपनिय गुन्हा करण्याच्या उद्देशाने उभा आहे. अशी माहीती मिळताच पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी जावुन आरोपीला गाठुन त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याचे नाव **अंकीत उर्फ पंडीत रमेशचंद्र शुक्ला , वय ४० वर्षे,रा सत्यम विहार कॉलनी ,कल्याणपुर जि कानपुर ह.मु. गुलमोहर नगर, कळमना** अशी माहीती प्राप्त झाली. आरोपीची पंचासमक्ष झडती घेतली असता त्याचे ताब्यात एक देशी बनावटी चे अग्निशस्त्र माऊजर , २ जिवंत काडतुस असे मिळुन आले. आरोपीला अग्निशस्त्राबाबत परवाना विचारला असता त्याच्या कडे परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. आरोपीला सदर अग्निशस्त्र कोठुन आणले याबाबत विचारणा केली असता त्याने सदर अग्निशस्त्र विश्वास राहुल सोलंकी, वय २७ वर्षे, रा तिडंगी ,पारधी बेडा ता कळमेश्वर याच्या कडुन ५० हजाराला विकत घेतल्याचे सांगितले. पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातुन एक लोखंडी देशी बनावटीचे अग्निशस्त्र माऊजर किंमती ५०,००० /— रूपये, २ जिवंत काडतुस २०००/— रूपये, अॅड्रॉईड मोबाईल किंमती २०,०००/— रूपये, असा एकुण ७२,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

आरोपी नामे १) अंकीत उर्फ पंडीत रमेशचंद्र शुक्ला , वय ४० वर्षे,रा सत्यम विहार कॉलनी ,कल्याणपुर जि कानपुर ह.मु. गुलमोहर नगर, कळमना २) विश्वास राहुल सोलंकी, वय

२७ वर्षे, रा तिडंगी ,पारधी बेडा ता कळमेश्वर यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन केळवद येथे कलम ३,५,२५ भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**कारवाई क्र . ३** स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अग्निशस्त्रांबाबत कारवाई करणे कामी पेट्रोलींग करीत असतांना गुप्तबातमीदारा मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, केळवद पोलीस स्टेशन हद्दीत बिहाडा फाटा येथे आरोपी नामे अवि पटले हा त्याचे ताब्यात देशी बनावटीचे माउजर व जिवंत काडतुस घेवुन हस्तक्षेपनिय गुन्हा करण्याच्या उद्देशाने उभा आहे. अशी माहीती मिळताच पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी जावुन आरोपीला गाठुन त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याचे नाव **सुनिल उर्फ अवि आधारसिंग पटले , वय ३४ वर्षे,रा म्हाडा क्वार्टर ,नारी रोड, जरीपटका नागपुर** अशी माहीती प्राप्त झाली. आरोपीची पंचासमक्ष झडती घेतली असता त्याचे ताब्यात एक देशी बनावटी चे अग्निशस्त्र माऊजर , २ जिवंत काडतुस असे मिळुन आले. आरोपीला अग्निशस्त्राबाबत परवाना विचारला असता त्याच्या कडे परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. आरोपीला सदर अग्निशस्त्र कोठुन आणले याबाबत विचारणा केली असता त्याने सदर अग्निशस्त्र विश्वास राहुल सोलंकी, रा तिडंगी ,पारधी बेडा ता कळमेश्वर याच्या कडुन ५० हजाराला विकत घेतल्याचे सांगितले. पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातुन एक लोखंडी देशी बनावटीचे अग्निशस्त्र माउजर किंमती ५०,००० /— रूपये, २ जिवंत काडतुस २०००/— रूपये, ॲड्रॉईड मोबाईल किंमती २०,०००/— रूपये, असा एकुण ७२,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

आरोपी नामे १) सुनिल उर्फ अवि आधारसिंग पटले , वय ३४ वर्षे,रा म्हाडा क्वार्टर ,नारी रोड, जरीपटका नागपुर २) विश्वास राहुल सोलंकी, वय २७ वर्षे, रा तिडंगी ,पारधी बेडा ता कळमेश्वर यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन केळवद येथे कलम ३,५,२५ भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**कारवाई क्र . ४** स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अग्निशस्त्रांबाबत कारवाई करणे कामी पेट्रोलींग करीत असतांना गुप्तबातमीदारा मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, पोलीस स्टेशन खापरखेडा हद्दीतील मौजा पिपळा, डाग बंगला येथील आरोपी नामे राहुल तागडे हा त्यांचे टाटा पंच कार क्रमांक एम एच ४० सी.एच. २८२२ मध्ये देशी बनावटीचे माउजर व जिवंत काडतुस घेवुन हस्तक्षेपनिय गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरत आहे. अशी माहीती मिळताच पोलीसांनी

तात्काळ पिपळा, डाग बंगला येथे जावुन संशयीत चारचाकी गाडी आणि आरोपीचा शोध घेतला असता टाटा पंच कार क्रमांक एम एच ४० सी.एच. २८२२ मिळुन आली.त्यात बसलेल्या इसमास नाव पत्ता विचारले असता त्याने राहुल राजेंद्र तागडे, वय ३० वर्षे, रा. पिपळा,डाग बंगला वार्ड क्र २ अशी माहीती दिली. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपी आणि त्याचे वाहनाची झडती घेतली असता आरोपीच्या ताब्यातुन एक अग्निशस्त्र माऊजर त्याच्या मॅग्झीन मध्ये २ काडतुस असे मिळुन आले. आरोपी ला अग्निशस्त्राबाबत परवाना विचारला असता त्याच्या कडे परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. आरोपीला सदर अग्निशस्त्र कोठुन आणले याबाबत विचारणा केली असता त्याने सदर अग्निशस्त्र त्याचा मित्र नामे राष्ट्रपाल मेश्राम याचे असुन राष्ट्रपाल मेश्राम ने अग्निशस्त्र तिडंगी येथील विश्वास सोलंकी याच्या कडुन ५० हजाराला विकत घेतल्या बाबत माहीती दिली. पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातुन एक लोखंडी देशी बनावटीचे अग्निशस्त्र किंमती ५०,००० /— रूपये, २ जिवंत काडतुस २०००/— रूपये, अॅड्रॉईड मोबाईल किंमती २०,०००/— रूपये, टाटा पंच कार क्रमांक एम एच ४० सी.एच. २८२२ किंमती ५,००,०००/— रूपये असा एकुण ५,७२,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

आरोपी नामे १) राहुल राजेंद्र तागडे, वय ३० वर्षे, रा. पिपळा, डाग बंगला वार्ड क्र २ ,२) सौरभ उर्फ शाहरूख रमेश राजपुत, वय २९ वर्षे ,रा ओझा ढाणा, पोलीस स्टेशन कोतवाली जि बैतुल राज्य मध्यप्रदेश ३) विश्वास राहुल सोलंकी, वय २७ वर्षे, रा तिडंगी ,पारधी बेडा ता कळमेश्वर ४) राष्ट्रपाल मधुकर मेश्राम रा पिपळा डाग बंगला यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन खापरखेडा येथे कलम ३,५,२५ भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वरील कारवाई वरून असे निष्पन्न झाले की, आरोपी नामे सौरभ उर्फ शाहरूख रमेश राजपुत, वय २९ वर्षे ,रा ओझा ढाणा, पोलीस स्टेशन कोतवाली जि बैतुल राज्य मध्यप्रदेश हा आरोपी नामे विश्वास राहुल सोलंकी, वय २७ वर्षे, रा तिडंगी ,पारधी बेडा ता कळमेश्वर याच्या मार्फतीने अवैध रित्या अग्निशस्त्रे/ हत्याराची इतर आरोपीतांना विक्री करतो. **आरोपी नाम १. विश्वास राहुल सोलंकी, वय २७ वर्षे, रा. तिडंगी ,पारधी बेडा ता कळमेश्वर, २. राहुल राजेंद्र तागडे, वय ३० वर्षे, रा. पिपळा,डाग बंगला वार्ड क्र २ , ३. सुनिल उर्फ अवि आधारसिंग पटले , वय ३४ वर्षे,रा म्हाडा क्वार्टर ,नारी रोड, जरीपटका नागपुर, ४. अंकीत उर्फ पंडीत**

**रमेशचंद्र शुक्ला , वय ४० वर्षे,रा सत्यम विहार कॉलनी ,कल्याणपुर जि कानपुर ह.मु. गुलमोहर नगर, कळमना यांना अटक करण्यात आली असुन स्थानिक पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखा नगापुर ग्रामीण सदर गुन्हयात सखोल तपास करीत आहेत.**




## प्रतिबंधीत सुगंधित पानमसाला वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## १ कोटी ३ लाख ८२ हजार ४०० रूपयांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक ०१/०४/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांचे पथक अवैध धंदयावर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असता सावनेर शिवारात बोरगाव फाटा येथे टि.एस. ०७ यु.एम. ८९४८ हा ट्रक संशयीत रित्या जाताना मिळुन आला. वाहन संशयीत वाटल्याने सदर वाहनास थांबवुन वाहन चालकाला व त्याच्या साथीदाराला नाव पत्ता विचारले असता आरोपी क्रं १ वाहन चालक नामे **संगमेश शेरेकर.रा. हुमनाबाद कर्नाटक,** आरोपी क्रं २ **क्लिनर नामे आनंद**

**रत्नाकर रा. हुमनाबाद, कर्नाटक** अशी माहीती प्राप्त झाली. वाहनाची तपासणी केली असता **महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित केसर युक्त  सागर पानमसाला आढळुन** आला. चालक आरोपीला सदर वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता **आरोपी कं ३ वाहन मालक इस्माईल शेठ रा हैद्राबाद असे नाव समजले तसेच आरोपी कं ४  ईस्माईल शेठ चा मॅनेजर गुरूजी** याने सदर प्रतिबंधित पान मसाला ट्रक मध्ये भरून दिल्याबाबत माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन **१)  केसर युक्त  सागर पानमसाला एकुण ४३,२०० पॉकीट एकूण किंमती ७८,६२,४००/— रूपये २) अशोक लेलँड कंपनीचा ६ चक्का ट्रक क्र, टि.एस. ०७ यु. एम ८९४८ एकूण किंमती  २५,००,००० /— रूपये,३) २ ॲन्ड्रॉईड मोबाईल किंमती २०,०००/— रूपये असा एकुण १,०३,८२,४०० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

वर नमुद  चारही आरोपीतांविरूद्ध पोस्टे सावनेर  येथे अन्न सुरक्षा माणके अधिनियम आणि भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **आरोपी चालक आणि क्लिनर (वाहक) यांना अटक करण्यात आली आहे.**



# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद ३० लाख ७० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त ,२ आरोपी अटक उपविभागिय पोलीस अधिकारी , कन्हान यांची कारवाई

दिनांक ०१/०४/२०२५ रोजी श्री संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधीकारी ,कन्हान हे त्यांच्या पथकासह खापरखेडा पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना वारेगाव कडुन खापरखेडा कडे जात असतांना त्यांना एक संशयीत ट्रक क्र. एम. एच. ४० सी. एम. ७७५१ हे मिळुन आले. वाहन संशयीत वाटल्याने पोलसांनी वाहन थांबविले . वाहनास थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये रेती मिळून आली._**वाहन चालक आरोपी क्र १ नामे ललीत अशोकराव तळसकर ,वय ३१ वर्षे, रा. सांवगी, ता. रामटेक आणि क्लिनर आरोपी क्रं २ नामे प्रशांत विवके मरस्कोल्हे, वय २५ वर्षे, रा. सांवगी, ता. रामटेक मिळुन आले.** त्यांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांच्या कडे २ ब्रास रेती वाहतुकीचा परवाना होता. परंतु वाहनामध्ये १४ ब्रास रेती मिळुन आली. मालकाचे नावा बाबत तपास केला असता **आरोपी क्र ३ वाहन मालक बलराम रामनाथ यादव, रा वार्ड क्र ३, घर क्रं ४६० चनकापुर अशी माहीती प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) **१४ ब्रास रेती किंमती ७०,००० /— रूपये आणि २) एम. एच. ४० सी. एम. ७७५१ किंमती ३०,००,०००/— रूपये असा एकुण ३०,७०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद ३ आरोपीतांच्या विरूध्द पोस्टे खापरखेडा येथे कलम ३०३(२),३(५), ४९ भा. न्या. संहिता, बि एन एस. सहकलम ४८ (८),४८ (७) महा. जमीन महसुल अधिनीयम व कलम ४,२१ खान व खनीजे अधिनीयम,१९५७. कलम ३ सार्वजनीक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम,१९८४ ,सहकलम ५०,१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी क्र १ आणि २ यांना अटक करण्यात आली आहे.**




# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
# स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक ०१/०४/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पेट्रोलीग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली **पोलीस ठाणे पारशिवणी हद्दीत मौजा करंभाड शिवारात पारडी घाटातून अवैधरीत्या विनापरवाना** रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी **करंभाड शिवारात पारडी घाटात** जात असतांना एक **अशोक लेलँड कंपनीच्या १० चक्का ट्रक** क्रमांक एम एच ३७ टी १९७६ मिळुन आला. पोलीसांनी वाहन थांबवुन वाहन चालकाला नाव पत्ता विचारला असता, **निलेश बुद्धवान धूर्वे वय २१ वर्ष रा. चिंचोली ता. सावनेर** .अशी माहीती प्राप्त झाली. वाहनामध्ये रेती असल्याने त्याला परवान्याबाबत विचारणा केली असता

त्याच्या कडे परवाना नसल्याचे सांगितले. तसेच इतर आरोपीतांबाबत माहीती विचारली असता त्याने सांगितले की **१) कार्तिक येसने रा. चिंचोली, खापरखेडा. २) प्रतीक घारड रा. पारडी तालुका पारशिवानी ३) पिवळ्या रंगाच्या जेसीपी चालक यांच्या सह मिळुन करंभाड शिवारात पारडी घाटातून अवैधरीत्या रेती वाहनात भरल्याची माहीती दिली.**

**पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ७ ब्रास रेती किंमती ३५,०००/रूपये आणि २) अशोक लेलँड कंपनीच्या १० चक्का ट्रक क्रमांक एम एच ३७ टी १९७६ किंमती ३५,००,०००/—रूपये , ३) एक ॲपल कंपनीचा मोबाईल किंमती ८०,०००/— रूपये असा एकुण ३६,१५,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

सदर प्रकरणी वर नमुद आरोपीतांच्या विरूध्द पोस्टे पारशिवणी येथे कलम ३०३(२), ४९(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७) ४८(८) म.ज म सहीता सहकलम ४.२१. खान खनिज अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद ४३ लाख ७० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त अरोली पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन अरोली**:— अरोली पोलीस, हददीत पेट्रलिंग करीत असतांना पोलसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी खालील प्रमाणे २ गुन्हे नोंद केले.

१. **दिनांक ०१/०४/२५** रोजी मिळालेल्या महीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा किरणापुर कडुन दुधाळाकडे जाणाऱ्या रोड वर पेट्रोलींग केली असता संशयीत टिप्पर क्रमांक एम.एच ४० बी.जी ४६५४ हे याला थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी नामे **सेवक दयाराम झंझाळ, वय २९ वर्षे, पत्ता. हिवरा,** मोहाडी जि भंडारा **आणि क्लिनर नामे नितीन केशोराव नागफासे, वय ३२ वर्षे, रा कांद्री,** मोहाडी जि भंडारा **असे वाहनात मिळुन आले. त्यांना** परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालकाचे नाव पत्ता विचारले असता **विपीन केशोराव नागफासे**

रा कांद्री,मोहाडी जि भंडारा अशी माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन **१)** ७ ब्रास रेती आणि **२)** वाहन क्रमांक एम.एच ४० बी.जी ४६५४ **असा एकुण १८,३५,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

२. **दिनांक ०२/०४/२५** रोजी मिळालेल्या महीतीच्या आधारे पोलीसांनी मसला ते अरोली रोड वर दुर्गा राईस मिल जवळ नाकाबंदी केली असता संशयीत टिप्पर क्रमांक एम.एच ४९ ए.टी. ४१०१ हे याला थांबवुन वाहनाची पाहणी केली असतात्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी नामे **भारत महादेव चिकाने, वय ३० वर्षे, पत्ता. कन्हान जि नागपुर हा वाहनात मिळुन आले. त्यांना** परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालकाचे नाव पत्ता विचारले असता **नितीन गोविंदराव रेतवकर,**रा नागपुर अशी माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन **१)** ७ ब्रास रेती आणि **२)** टिप्पर क्रमांक एम.एच ४९ ए.टी. ४१०१ **असा एकुण २५,३५,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे. दोन्ही कारवाईत एकुण ४३,७०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**वर नमुद ५ आरोपीतांच्या विरूध्द पोस्टे अरोली येथे कलम ३०३(२),४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम,सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान अन्वये २ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. सेवक दयाराम झंझाळ, वय २९ वर्षे, पत्ता. हिवरा, मोहाडी जि भंडारा, नितीन केसोराव नागफासे, वय ३२ वर्षे, विपीन केसोराव नागफासे दोघे रा. रा कांद्री, मोहाडी जि भंडारा आणि भारत महादेव चिकाने, वय ३० वर्षे, पत्ता. कन्हान जि नागपुर यांना अटक करण्यात आली आहे.**




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर